Tuesday, October 01, 2024
7:30 PM

## अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक ०१/१०/२०२४

**खुनाचा प्रयत्न करणे :-**

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|
| १ | पोस्टे वलागव अप क्र.274/2024 कलम 109,3(5), बि.एन.एस .सह क.3,/25,27 शस्त्र कायदा अधिनीयम प्रमाणे गुन्हा दाखल. | अमरावती ते दर्यापुर रोड पाटील धाब्या जवळ वलगाव | दि.30/09/2024 चे 23/45 वा.<br><br>दाखल दि.01/10/2024 चे 11/41 वा. | गोपाल श्रीधरराव अरबट वय 43 वर्ष धंदा जिल्हा अध्यक्ष (शिवसेना ) रा.गजानन कॉलनी दर्यापुर जि.अमरावती. | हकिकत अशा प्रकारे आहे कि,यातील फिर्यादी दि.30/09/2024 रोजी रात्री 11/45 वा. च्या समारास मी माझे ईनोवा गाडी क्र.एम.एच.-27 डी.ई. 0022 ने अमरावती येथुन दर्यापुर कडे जात असतांना दि.21/07/2024 रोजी माझा मित्र राहुल भुंबर व राम अरुन पडोळे यांचे झालेल्या वादाचे कारण वरुन तसेच अरुन पडोळे यांना शिव सेना पक्षा मध्ये माझे वर्चस्व सहन होत नसल्याने अरुन पडोळे यांचे सांगण्या वरुन प्रविन दिधाते व सागर खिराडे यांनी त्यांचे संपर्क मधिल काही अज्ञात मुलांना पाठवुन मला जिवाने ठार मारण्याच्या उद्देशाने गोळीबार केला असल्याचा मला संशय आहे. माझा जबारी रिपोर्ट माझे सांगितल्या प्रमाणे टाईप केला प्रिन्ट काढल्या नंतर मी वाचुन पाहीला तो बरोबर आहे.शा फिर्यादिच्या जबानी रिपोर्ट वरुन सदर चा गुन्हा दाखल |

➢ अपघात :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०२ | पो. स्टे. नांदगाव पेठ अप.न. ३३१/२०२४ कलम ३८१,१२५ (A),१२५ (B) BNS सहकलम १३४ मो.वा.का. | कॅंट इंडस्ट्रीज समोरील पुलाजवळ मोर्शि रोड अमरावती | दि. ३०/०९/२०२४ चे १९.४५ वा. दाखल ता. वेळ दि. ०१/१०/२०२४ चे ००.२५ वा. | भुषन अरविंद लांडे वय ३० वर्ष रा. साई मंदिर गोविंद विहार, वरुड जि.अमरावती | इरटीका गाडी क्र. MH-१६ BH-३१८६ चा चालक | हकीकत अशाप्रकारे आहे की यातील फिर्यादी हे PWD डिपार्टमेंट ला काम असल्याने काम आटोपुन वरुड ला परत त्याचे बलोनो गाडी क्र. MH-२७ BV - ३९९५ ने मित्र हर्षल ठाकरे व काकु वय ६५ वर्ष असे जात असता मोर्शि रोडने अमरावती कडे येणारी पांढ-या रंगाची इरटीका गाडी क्र. MH-१६ BH- ३१८६ चा चालकाने भरधाव वेगाने येवुन समोरील येणा-या ट्रक ला ओव्हरटेक करीत असतांना गाडीचा ताबा सुटून फिर्यादीच्या गाडीला उजव्या साईडला धडक दिल्याने गाडीचे चारही दरवाजे तुटले व गाडी मध्ये बसलेल्या काकु यांना पाठीला व कमरेला मार लागला व हर्षल ठाकरे याचे डोक्याला व खांद्याला मार लागला तसेच फिर्यादीचे गाडीचे मागे असलेली ओला कं. काळ्या रंगाची टु व्हीलर गाडी क्र. MH-२७ DS- ८१६४ धडक दिल्याने पुर्ण तुटून त्यावरील दोघे इसम जखमी आहे. नमुद इरटीका गाडी क्र. MH-१६ BH- ३१८६ चा चालकाने आपले वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन अपघात करुन नुकसान केले. अशा फिर्यादी चे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ ईतर :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०२ | पो. स्टे. नांदगाव पेठ अप.न. ३३२/२० २४ कलम ३५१(३) बी.एन.ए. सह कलम ४,२५ भा. हत्यार कायदा | हॅारीझॉन हाईट्स, जकात नाका जवळ अमरावती | दि. ३०/०९/२०२४ चे २१.१५ वा. दा. ता. वेळ दि. ०१/१०/२०२४ चे ०१.३२ वा. | सरतर्फे पोकॉ संजय हरीदास इंगोले ब.न. ११३६ वय ४२ वर्ष पोस्टे. नांदगाव पेठ | अंक्टीव्हा गाडी क्र. MH-२७ BR-१०३५ चा चालक | हकीकत अशाप्रकारे आहे की यातील फिर्यादी यांची नांदगाव पेठ सि.आर मोबाईल वर दि. ३०/०९/२०२४ चे सकाळी ०९.०० वा. ते २१.०० वा. पावेतो डयुटी असतांना २१.१५ वा. सुमारास कंट्रोल चा कॉल आला असता कॉलरचा मोबाईल न. वर कॉल केला असता तो वैभव येवकर रा. नवसारी असे सांगीतले. नमुद घटनास्थळी चालक पोकॉ २३२ सह गेलो असता कॉलर यांनी सागीतले की माझे बाधकाम सुरु आहे व तेथे काही बेवडे दारु पित होते त्यांना जा म्हटले तर जात नाही असे म्हणुन एका ने घरी जावुन तलवार आनली कॉलरच्या मोबाईल मध्ये व्हिडीओ रेकॉर्डीग पाहली असता त्यामध्ये एक उंच गोरा मुलगा हातामध्ये तलवार घेऊन चालतांना अंगावर येतांना दिसत आहे. फिर्यादी यांना कॉलर ला तक्रार देण्यास म्हटले असता त्यांनी नकार दिला. वरुन फिर्यादी यांनी व्हिडीओतील मुलगा हा गुन्हेगारी स्वरुपाचा असल्याने सरकारतर्फे फिर्यादी देत आहे. अशा फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| ०४ | पोस्टे सिटी कोतवाली अप क्र ३७१/२० २४ | मालविय चौक अमरावती | गु. घ. ता वेळ दि ३०/०९/२४ चे २२.०० वा गु. दा. | पोहेका सपाउपनि रंगराव जाधव ब न ९२१ पो. स्टे सिटी कोतवाली | रविकुमार सहदेवराव पुसनाके वय ४८ वर्ष। रा जाफरजीन | हकिकत अशा प्रकारे आहे की ,नमुद घ ता वेळी व ठिकाणी फिर्यादी यांची दि.०९.०४.२०२४ चे २१.०० वा ते ०९.०० वा दरम्यान पेट्रोलिंग ड्युटि असता नमुद ठिकाणी स्टाफ सह पेट्रोलिंग दरम्यान नमुद ईसम हा मानवी जिवन धोक्यात येईल अगर अन्य कोनत्याही व्यक्तीला दुखापत किंवा नुकसान पोहचवन्याचा संभव असेल ईतक्या बेदरकपणे व हयगयिने आपल्या टपरीत दुकानात ज्वालाग्राही पदार्थ असलेले गॅस सिलेंडर भारत.कंपनिचे सिलेंडर वापरतांना |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | कलम २८७ BNS | | त ावेळ दि ०१/१०/२४ चे ००.१६ वा | अमरावती शहर | प्लॉट अमरावती | मिळुन आला त्यास त्याचे नाव गाव विचारले अशता त्याने आपले नाव रविकुमार सहदेवराव पुसनाके वय ४८ वर्ष। रा जाफरजीन प्लॉट अमरावती असे सांगितले वरुन त्याचे विरुध्द कलम २८७ BNS प्रमाने डि ओ सा यांचे आदेशाने गुन्हा दाखल |

➢ आकस्मीक मृत्यू :-

| अ.क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटना स्थळ | घटना ता वेळ दाखल ता वेळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | अकस्मात मृत्यूचे विवरण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोस्े. नांदगाव पेठ मर्ग न. ४०/२४ कलम १९४B NSS | वेदांत खंडेलवाल यांचे साईडवर कल्पदिप मंगल कार्यालयाचे मागे झोपडपट्टीत रिंगरोड अमरावती | घ.ता. वेळ्- दि. ०१/१०/२०२४ चे सकाळी ०४.०० वा. दाखल ता. वेळ् दि. ०१/१०/२०४ चे ०८.३८ वा, | अभीजीत भानुदास भांगे वय २६ वर्ष रा. आदित्य नगर रहाटगाव अमरावती | भानुदास नागोराव भांगे वय ५५ वर्ष रा. आदित्य नगर रहाटगाव अमरावती | हकीकत अशाप्रकारे आहे की मृतक हा फिर्यादीचा मुलगा असुन नमुद घ. ता. वेळी व ठिकाणी मृतकाने झोपडीत बांधलेल्या लोखंडी पाईप ला पांढ-या बारीक दोरीने बांधुन गळफास घेतला. त्यास पो.स्टांफ व लोकांचे मदतीने ईर्विन दवाखाना येथे इलाजाकरीता नेले सता मे. डॉ सा. यांनी तपासुन मृत घोषीत केले. फिर्यादी यांचा मृतकाच्या मरनाबाबत कोणावरही संशय नाही. अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा मर्ग दाखल |